INDIA GREENS PARTY

**इंडिया ग्रीन्स पार्टी पक्षाचा विधानसभा निवडणूक २०१९ साठी जाहीरनामा:**

*पाणी आणि शेती*

पाणी वाटप करतांना निसर्गातील वन्यजीवांची गरज,पिण्याचे पाणी,शेतीचे पाणी आणि उद्योगाचे पाणी हा क्रम कायम करण्यात यावा.

प्रत्येक गावाला गावातच वर्षभर पिण्याचे शुध्द  पाणी उपलब्ध झाले पाहिजे.

शहरातील पाण्याचा पुरवठा नियंत्रित करण्यात यावा. वेळ पडल्यास पावसाळा संपल्या नंतर लगेचच पाणी कपातीचे धोरण निश्चित करुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. प्रत्येक सोसायटीत  पाण्याचे मीटर बसविण्यात यावे.

सर्व प्रकारच्या नैसर्गिक पाणी स्त्रोतांची माहिती संकलीत करून त्याचे संरक्षण आणि जतन करण्यासाठी योजना तयार करून त्यासाठी दरवर्षी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यात यावी.

जैव विविधतेने समृध्द जल स्त्रोतांना  विशेष संरक्षण देण्यात यावे.नैसर्गिक जल स्त्रोताचे कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही याची दक्षता घेण्यात  यावी.महत्वाच्या जलस्त्रोतंवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक  यंत्रणा उभारण्यात यावी.

जल स्त्रोताच्या पाणलोट क्षेत्रात वनी करणावर भर देण्यात यावा. धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील ६६% क्षेत्र वृक्ष  आच्छादन तयार करण्यासाठी योजना तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

पुढील काही वर्ष मोठे धरण न बांधता अपूर्ण जल सिंचन योजना पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा. जल सिंचन योजनेतील भ्रष्ट्राचाराची चौकशी तात्काळ पूर्ण करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

भूजल  पुनर्भरणासाठी आणि त्याच्या शाश्वत वापरासाठी ग्रामस भेशी  चर्चा करून मार्गदर्शक तत्वे विकसित करणे आवश्यक आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी मर्यादेच्या बाहेर गेलेल्या क्षेत्रात विहीर, कू पनलिका घेण्यावर व त्यांच्या वापरावर बंधने आणण्यासाठी आवश्यक कायदा करण्यात यावा.

सिंचन प्रकल्प आणि पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प यांच्या विकासासाठी असणारी निधीची सध्याची तरतूद ८०:२० वरून ५०:५० अशी करण्यात यावी.

राज्यात रामसर करारातील  तरतूदीनुसार महत्वाच्या जाल्युक्त भूमी आणि पाणथळी ह्यांचे संरक्षण आणि  संवर्धन  करण्यात यावे.

राज्यातील नद्यांची ब्ल्यू आणि रेड लाईन पूर रेषा दर्शवणारे  नकाशे निश्चित करून ब्ल्यू लाईनच्या आत करण्यात आलेली सर्व प्रकारची अतिक्रमणे तत्काळ हटवण्यात यावीत. ब्ल्यू आणि रेड लाईनच्या क्षेत्रात करण्यात आलेल्या अतिक्रमणाची त्रयस्थ  यंत्रणेमार्फत चौकशी करून परिस्थितीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. या क्षेत्रात मर्यादित विकास करण्यात यावा व मर्यादित विकासा अंतर्गत येणाऱ्या बाबी स्पष्ट करण्यात याव्यात.नदीच्या दोन्ही काठांवर काठ स्थिर करण्याच्या उद्देशाने किमान १०० मीटर रुंदी पर्यंत वनीकरण करण्यात यावे. संपूर्ण शहराचा ड्रेनेज मॅप तयार करून कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक नाले ,ओढे यावर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेतली जाईल. शक्य तेथे ओढे नाले यांच्या दोन्ही काठांवर  १० मीटर पर्यंत वनी करण करण्यात येईल.

*शेती*

शेतीच्या सगळया नैसर्गिक प्रकारांचा क्रमाने विकास करण्यावर आणि रासायनिक कीटकनाशके,वाढीसाठी वापरली जाणारी संप्रेरके ,रासायनिक ख ते आणि शेतीची प्रचंड मोठी यंत्रसामुग्री यांना आमचा विरोध आहे.

उसाच्या शेतीतील पाण्याच्या वापरावर बंधने आणणारा कायदा करण्यात यावा. यात पाण्याचा तुटवडा असलेल्या क्षेत्रात ठिबक सिंचन शिवाय उस लागवडीला परवानगी देण्यात येऊ नये. मराठवाडयातील साखर कारखान्यांची संख्या कमी करण्यात येऊन मुबलक पाणी असलेल्या क्षेत्रात त्यांचे स्थलांतर करण्यात यावे.

येत्या तीन  वर्षात शेतकऱ्यांची कर्जातून पूर्णपणे मुक्तता करण्यासाठी धोरण निश्चित करून किसान क्रेडिटकार्डच्या माध्यमातून शेती विकासासाठी आवश्यक   अनुदान   उपलब्ध करून देण्यात यावे. नैसर्गिक शेतीला यात प्राधान्य द्यावे. पीकविम्याचा योग्य लाभ मिळण्याच्या दृष्टीने विमा कंपन्यांसाठी मार्गदर्शक सूचना तत्काळ तयार करण्यात याव्यात. वन्य प्राण्यांपासून होणाऱ्या शेत पिकांचा नुकसानीचा समावेश विम्यात करण्यात यावा.

शेता-पिकाना शासनाने ठरून दिलेला दर मिळेल हे तपासण्यासाठी सक्षम यंत्रणा शासनाने तत्काळ निर्माण करावी.शेतमाल कमी किमतीत खरेदी करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने कायदा करण्यात यावा. शेतमाल साठविण्यासाठी ग्राम स्तरावर अद्ययावत गोदामांची उभारणी करणे आवश्यक आहे.

जुनकीय दृष्टया सुधारित वाणे आणि अन्न यांचा पुरस्कार करणाऱ्या धोरणाना आमचा विरोध असेल.

स्थानिक गरज आणि स्थानिक हवामानाचे घटक लक्षात घेऊन पीकपध्दती विकसित केली पाहिजे. पिकासोबतच औषधी,सुगंधी,वनस्पती बरोबरच इतर वृक्ष लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना अधिक प्रोत्साहन दिले पाहिजे. राज्यात बांबू मिशन जोमाने राबविण्याची गरज आहे.

फळझाडे लागवड व फळांवर प्रक्रिया करणारे  कारखाने उभारणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात यावे.

शेतीतील आणि पाळीव जनावरांतील  जैव विविधता संशोधन आणि  नोंदणीसाठी विशेष आर्थिक तरतूद करण्यात यावी.

पाळीव जनावरांच्या चाऱ्याची गरज लक्षात घेऊन चारापिकांना प्राधान्य द्यावे. विशेष अनुदान उपलब्ध करण्यात यावे.शेत जमीन पडिक ठेवणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतूद कायद्यात करण्यात यावी.

पाळीव जनावरांना मोफत लसीकरण करण्याची नुकतीच केंद्र शासनाने घोषित केलेली योजना राज्यात तातडीने राबविण्यात यावी. राज्यानेही त्यासाठी भरीव अनुदान उपलब्ध करून द्यावे.

राज्यात कृषी पर्यटनाला अधिक चालना देण्याची गरज आहे. भांडवलावर होणारा प्रचंड खर्च सामान्य शेतकऱ्याला परवडत नाही त्यासाठी त्याला कमी व्याजाने कर्ज दिले पाहिजे. वनक्षेत्राला लागून असलेल्या क्षेत्रात कृषी पर्यटनाला प्राधान्य दिल्यास शेतकऱ्याला त्यांचा अधिक लाभ होईल.

शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीने गावपातळीवर सुविधा निर्माण करावी.

शहरे बकाल झाली आहेत, भविष्यात अधिक बकाल होण्याची शक्यता नाकारता येत नाही; हे लक्षात घेऊन खेडे विकसित करण्याच्या उद्देशाने शेतीला आणि शेती पूरक व्यवसायांना भविष्यात प्राधान्य देण्याच्या दृष्टीने दरवर्षी भरीव आर्थिक तरतूद करावी जेणेकरून गावपातळीवर रोजगार निर्मितीला चालना मिळेल व लोक शहरात येण्याचे टाळतील.

*वने आणि वन्यजीव व्यवस्थापन*

पर्यावरण संवर्धनात वने आणि वन्यजीव इतर घटकांच्या तुलनेत महत्वाची कामगिरी बजावतात त्यामुळे वने आणि वन्यजीव यांचे संरक्षण आणि संवर्धन कामाला सर्वाधिक प्राधान्य देण्याची गरज आहे.

राज्यात पन्नास संरक्षित क्षेत्रे असली तरी त्यांचे एकूण क्षेत्र राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या अवघे ३% आहे. राष्ट्रीय धोरणानुसार ते किमान ५% असणे आवश्यक असल्याने राज्यात नवीन संरक्षित क्षेत्रे अथवा संवर्धन राखीव तसेच सार्वजनिक राखीव क्षेत्रे निर्माण करावीत.

राष्ट्रीय वन नीती नुसार ३३% वनाच्छादन निर्माण करण्याच्या दृष्टीने ग्रीन मिशन सारखी सर्वंकष योजना कालबध्द पध्दतीने राबविण्यात यावी आणि त्यासाठी केंद्र तसेच राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये दरवर्षी भरीव आर्थिक तरतूद करण्यात यावी.

पश्चिम घाट ह्या अत्यंत संवेदनशील सृष्टीव्यवस्थेचा उत्तरेकडील भाग महाराष्ट्रात येतो.त्याच्या संरक्षण संवर्धनासाठी कोणतेही प्रयत्न न करता आज तिथे निसर्गविनाशी मानवी हस्तक्षेप सरकारी आशीर्वादानेच चालू दिसतो.खरेतर गाडगीळ समितीचा अहवाल सदर बाबतीत पुरेसा स्पष्ट होता.तो डावलून सरकारने कस्तुरीरंगन समिती नेमली.त्यांच्याही शिफारशी सरकारने लागू केल्या नाहीत.ह्याबाबत निश्चित धोरण आखून पश्चिम घाटाचा विनाश रोखावा,अशी मागणी इंडिया ग्रीन्स पक्ष करीत आहे.

सर्व संरक्षित क्षेत्राच्या १० कि.मी. परिसरातील क्षेत्र पर्यावरणीय दृष्टया संवेदनशील क्षेत्र घोषित करुन या क्षेत्रावर असलेली बंधने काटेकोर पाळली जातील यावर देखरेख करणारी सक्षम आणि कायमस्वरुपी सरकारी यंत्रणा तयार करण्यात यावी. त्यामध्ये स्थानिक लोकांनाही सहभागी करून घेण्यात यावे.

विविध प्रकारच्या विकास कामांमुळे राज्यातील वनक्षेत्र तुकडया  तुकडयात विखुरले गेले आहे. कॉरिडॉरच्या साहायाने ते जोडणे आवश्यक आहे. यासाठी राज्यस्तरावर तज्ज्ञांची सल्लागार समिती नेमून त्यांच्या सल्ल्यानुसार ठिकठिकाणी  कॉरिडॉरच्या उभारणीचे काम कालबध्द पध्दतीने करण्यात यावे.

संरक्षित क्षेत्रे आणि त्यांच्या १० कि.मी. परिसरातील गावातील पाळीव जनावरांचे दरवर्षी न चुकता मोफत लसी करण करण्यात यावे. केंद्र शासनाने नुकत्याच जाहिर केलेली योजना प्राधान्याने संरक्षित क्षेत्रात राबविण्यात यावी.

मानव वन्यप्राणी यांचेतील  संघर्ष दिवसेदिवस वाढत आहे. तो कमी करण्यासाठी तातडीने आवश्यक पाउले उचलण्यात यावीत. यात नुकसान भरपाईची भरीव रक्कम ३० दिवसात देणे, महत्वाचे म्हणजे प्रती हेक्टर नुकसान भरपाईची रक्कम रुपये २५,०००/- वरून रुपये ४०,०००/- इतकी करणे.शेती संरक्षण साठी कुंपण उभारण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे, कळपातील वन्य प्राण्यांची संख्या नियंत्रि त करण्यासाठी उपाययोजना करणे,पकडलेल्या तसेच जखमी प्राण्यांची देखभाल करण्यासाठी किमान प्रत्येक महसूल विभाग स्थरावर देखभाल केंद्रे उभारणे, नागपूर येथिल प्राणी संग्रहालयाची उभारणी तातडीने पूर्ण करणे, तालुका स्तरावर वन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रसिद्धीच्या योजनेमध्ये  मानव वन्यप्राणी संघर्ष या विषयावर लोकांना प्राधान्याने मार्गदर्शन करणे या बाबींचा समावेश आहे.

आजही  राज्यात सर्वत्र वन्य प्राण्यांच्या शिकारी होत आहेत.  वन्य प्राण्यांची तस्करीही  सुरू आहे.त्यावर तातडीने नियंत्रण आणण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारणे आवश्यक झाले आहे. वने आणि वन्य प्राणी यांचे प्रभावी संरक्षण आणि संवर्धनासाठी वन खात्यातील कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या आणि क्षेत्र यांची छोटया क्षेत्रात पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे. सर्व प्रकारच्या गुन्ह्यांसाठी स्वतंत्र वन कोठड्या आणि वन न्यायालये स्थापन करण्याची गरज आहे.

झटपट परिणामांसाठी लावलेल्या विदेशी प्रजाती कालबध्द पध्दतीने नष्ट केल्या जातील विशेषत: संरक्षित क्षेत्रात हे काम प्राधान्याने हाती घेण्याची गरज आहे.

गवताळ प्रदेश आणि तेथील प्राणी -वनस्पती यांना स्वतंत्र परिसंस्था मानून त्यांच्या संवर्धनासाठी सर्व मार्गांचा अवलंब केला जाईल. माळढोक पक्ष्याच्या संवर्धनासाठी मराठवाडयातील निवडक जिल्ह्यांमध्ये किमान २% खाजगी क्षेत्र संपादित करण्याची गरज आहे.

पाणथळ जमिनीच्या व्यवस्थापनाचे २०१० चे नियम कायम राखून त्यानुसार पाणथळ जमिनीचे संरक्षण केले जाईल. २०१७ ची नियमावली रद्द केली जाईल.

संरक्षित क्षेत्रात नियंत्रित पर्यटन तसेच इतर ठिकाणच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. पर्यटनाचा सर्वाधिक फायदा स्थानिक लोकांना देण्याच्या द्रृष्टीने विशेष उपाययोजना करण्यात येतील.

वन्य प्राण्यांच्या प्रभावी संवर्धनासाठी राज्याचे स्वतंत्र वन्यजीव धोरण तयार करण्यात येईल.

IUCNच्या यादीतील धोक्यात आलेल्या, धोक्याच्या उंबरठयावर असलेल्या सर्व प्रकारच्या छोटे सस्तन वन्य प्राणी आणि वनस्पतींच्या संरक्षणासाठी राज्यस्तरीय स्वतंत्र प्राधिकरणाची निर्मिती केली जाईल.

वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ आणि जैव विविधता कायदा २००२ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. जैव विविधता नोंदणीचा कालबध्द कार्यक्रम राबविण्यात यावा. जैव विविधता नोंदणीच्या कामात मोठया प्रमाणावर महा विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्याची गरज आहे.

वन हक्क कायद्या अंतर्गत वन निवासींना हस्तांतरित करण्यात आलेल्या वनक्षेत्राच्या विकासासाठी विशेष योजना राबविण्यात येईल. वाटप केलेल्या वन  क्षेत्राची सद्य स्थिती

जाणून घेण्यासाठी आवश्यक संशोधन करण्याची गरज आहे.  जेणेकरुन वनवासींचा किमान आर्थिक विकास करणे शक्य होईल.

*शहरी प्रश्न*

शहरातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पुणे शहरात या बाबत २००८ साली कायदा करण्यात आला व गृह सहकारी संस्थांना ओला कचरा जागेवरच जिरवणे बंधनकारक करण्यात आले.पण आजही त्याचे काटेकोर पालन केले जात नाही. सुरवातीला महानगरपालिकेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांनी तपासणी न करताच ना हरकत प्रमाणपत्र दिले व बांधकाम व्यावसायिकांचे काम सोपे केले. कचऱ्याची  जागेवरच विल्हेवाट लावण्यासाठी गृह संस्थांना अधिक प्रोत्साहन देण्याची गरज आहे.सध्या या साठी मिळकत  करात फक्त ५% सूट  देण्यात येते ती किमान १० टक्के करणे आवश्यक आहे. सौर शक्ती निर्मिती करून तिचा वापर केल्यास व पावसाचे पाणी साठवणाऱ्या संस्थांना आणखी १०% असे मिळून मिळकत करात  एकूण किमान २० %  सूट देण्यात यावी.

कचरा नद्यांमध्ये अथवा रस्त्यावर फेकणाऱ्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याची वेळ आता आली आहे. त्यासाठी महानगरपालिकेने सक्षम यंत्रणा उभारण्याची गरज आहे. यामध्ये. सर्व मुख्य रस्त्यांवर,नद्यांच्या काठांवर  कॅमेरे लावणे, फिरती पथके निर्माण करणे, सोसायटीच्या कचरा प्रकल्पांची वेळोवेळी तपासणी करणे, परिसरातील कचरा गोळा करण्यासाठी सोसायटींना प्रोत्साहन देणे या बाबींचा प्रामुख्याने समावेश असेल.

कचरा प्रकल्प उभारण्यासाठी सोसायटींना मार्गदर्शन करणे, प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध करून देण्याचे, प्रबोधन करण्याचे  काम महानगरपालिकेने मोठया  प्रमाणावर करण्याची गरज आहे.

बांधकाम व्यवसायातील राडारोडा टाकण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची गरज आहे. या साठी बांधकाम व्यावसायिकांकडून शुल्क आकारता येईल.

पाण्याची बचत करण्यासाठी सोसायटींना पाण्याचा पुरवठा मीटर पद्धतीने करणे गरजेचे आहे.पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन पाणी पुरवठयामध्ये वेळोवेळी कपात करण्यात यावी. पाण्याचा साठा संपण्याची वाट न पाहता पावसाळ्या नंतर पाणी कपात करण्यात यावी. जेणे करून लोकांना काटकसरीने पाणी वापरण्याची सवय होईल.

खाजगी जागेत कूप नलिका, विहिरी बांधण्यावर नियंत्रण आणण्यासाठी नवीन कायदा करण्याची  गरज आहे.

शहरी भागात इलेक्ट्रोनिक कचरा संकलित करून त्यावर प्रक्रिया करणारी पुरेशी  वॉर्ड निहाय केंद्रे निर्माण केली जातील.

नैसर्गिक नाले, ओढे आणि नदीच्या काठांवर अतिक्रमण, बांधकाम  होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

संपूर्ण शहरात प्लास्टिक बंदी लागू करण्यात येईल.

शहरातील नैसर्गिक वनांचे संरक्षण आणि संवर्धनासाठी विशेष आर्थिक तरतूद केली जाईल. संयुक्त वन व्यवस्थापनाला अधिक चालना दिली जाईल. महानगरपालिकेच्या ताब्यातील मोकळ्या प्लॉटवर लोक सहभागातून  'जैव विविधता संवर्धन क्षेत्रे' निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल. यासाठी विशेष योजना राबविण्यात येईल.

पुणे शहर सह्याद्रीच्या कुशीत वसले असल्याने येथिल टेकडया व त्यावरील नैसर्गिक वने आणि वृक्षराजी   पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत त्यांना हात लावणे योग्य होणार नाही. म्हणूनच इंडिया ग्रीन्स पार्टी टेकडयांचे सर्व क्षेत्र   जैव विविधता उद्यानासाठी(BDP) राखिव ठेवण्या बाबत आणि   टेकडयांवर आतापर्यंत लावण्यात आलेले परदेशी  वृक्ष कालबध्द पध्दतीने काढून देशी वृक्ष लावण्याबाबत  आग्रही आहे. कोणत्याही कारणांसाठी टेकडी फोड करण्याला पक्षाचा तिव्र विरोध आहे कायम राहिल.

पुण्यातील टेकड्यां प्रमाणेच मुंबईतील आरेच्या क्षेत्रात मेट्रोची कार शेड उभारण्यासाठी करण्यात येणाऱ्या वृक्षतोडीलाही पक्षाचा विरोध आहे. आरेचे क्षेत्र जैव विविधतेने समृध्द आहेच पण इथली वृक्षराजी तयार होण्यास कित्येक  वर्ष खर्च झाली आहेत आणि आता ती मुंबईच्या पर्यावरणाचा संवेदनशील भाग बनली आहे. हे जंगल नाही म्हणणारे दुसऱ्यांचीच नाही तर स्वत:चीही फसवणूक करत आहेत. त्यांच्याकडे पर्यावरणीय शहाणीव (Ecological Wisdom) नाही इतकेच नव्हे तर  त्यांना शाश्वत विकास म्हणजे काय यांचाही  गंध नसल्याने ते समृध्द जंगल तोडण्याची भाषा करत आहेत. गेल्या ५०  वर्षात मुंबईच्या पर्यावरणाची प्रंचड हानी झाली असल्याने आता अशा प्रकारच्या समृध्द जंगलाची तोड करणे म्हणजे स्वत:च्या पायावर

धोंडा मारून घेण्या सारखे आहे.महत्वाचे म्हणजे हा भाग संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाशी संलग्न असून त्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचा (Eco Sensitive zone) अविभाज्य भाग आहे. ते नष्ट करण्याची भाषा करणारे लोक झटपट विकास साधण्याच्या उद्देशाने आंधळे झाले आहेत. म्हणूनच त्यांना आणि त्यांच्या नतद्रष्ट विचारांना विरोध करणे काळाची गरज आहे.

-०-० -